# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

ई-मेलव्दारे
निवडणूक तात्काळ

क्रमांक : रानिआ/नप-२०१६/ प्र.क्र.४२/का-६
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक :- २७/१२/२०१६.

प्रति,
जिल्हाधिकारी, (सर्व)
(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)

विषय : आचारसंहिता कालावधीत निवडणूक संनियंत्रण समितीने जप्त केलेल्या रोकड रकमा परत करण्याबाबत.

संदर्भ : १. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २४.११.२०१६ चे आदेश.
२. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाची दिनांक १७.१२.२०१६ व २१.१२.२०१६ ची पत्रे व दि. २३.१२.२०१६ चे स्मरणपत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.१ व २ चे पत्रांन्वये आचारसंहिता कालावधीत जप्त केलेल्या रकमा परत करण्याच्या विषयी सादर केलेल्या अहवालामध्ये रक्कम जप्त केल्याच्या वेळेपासुन केलेल्या सर्व कार्यवाही संबंधीची कागदपत्रे जसे जप्ती पंचनामा,जप्ती करण्यामागची कारणमिमांसा, जप्तीचे वेळी ज्या व्यक्तींकडून/वाहनातून रक्कम जप्त केली त्यासोबत असलेली कागदपत्रे तसेच तद्नंतर केलेली कार्यवाही, आयकर विभागाचे अभिप्राय/शिफारस तसेच रकमेचा वापर आचारसंहिता भंग किंवा मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांना प्रलोभन देण्याकरिता करण्यात येणार नव्हता या निर्णयाप्रत येण्याबाबतची कारणमिमांसा आणि जिल्हाधिकारी यांची रक्कम का परत करावी याबाबतची शिफारस इत्यादीसह स्वयंपूर्ण अहवाल दि.२६.१२.२०१६ पर्यंत सादर करावा असे आपणांस कळविण्यात आलेले आहे.

२. तथापि, ब-याच जिल्हाधिकारी यांचेकडून आयोगास अहवाल अद्याप प्राप्त झालेले नाहीत. जे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत ते स्वयंपूर्ण नाहीत. तसेच १००० व ५०० च्या नोटा बदलून घेण्याचा अंतिम दिनांक ३० डिसेंबर,२०१६ हया बाबी ध्यानी घेता नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या आचारसंहिता कालावधीत जप्त करण्यात आलेली रक्कम संबंधितांस परत करणेबाबतचे प्रस्ताव आता राज्य निवडणूक आयोगाकडे न पाठविता संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय

घेवून नगरपरिषदा/नगरपंचायती निवडणूकीच्या आचारसंहिता कालावधीत निवडणूक संनियंत्रण समितीने जप्त केलेल्या रोकड रकमा संबंधितांस परत कराव्यात.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार.

आपला,

(संजय सावंत)

कक्ष अधिकारी,

राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र